सकाळ
www.agrowon.com
# ॲग्रोवन
मित्र ग्लोबल शिवाराचा..



निर्धार गावांच्या सर्वांगीण विकासाचा ...पान ७



रोजगारासोबत पायाभूत सुविधांच्या निर्मितीवर भर ...पान ८-९

जातिवंत पशू संगोपन, प्रक्रिया उद्योगाला प्राधान्य | ग्रामविकासासाठी सरपंचाने 'लीडर' व्हावे — पान ८-९
अभ्यासू सरपंच हा ग्रामविकासाचा सूत्रधार — पान १०
राष्ट्रीय फलोत्पादन अभियानातून समृद्धी — पान ११

पुणे गुरुवार, १५ फेब्रुवारी २०१८ । पाने १६ । किंमत ₹ ३ । www.epaper.agrowon.com पुणे, कोल्हापूर, नाशिक, मुंबई, औरंगाबाद, सोलापूर, नागपूर, जळगाव, नांदेड, अकोला येथून प्रसिद्ध

# गारपीटग्रस्तांसाठी दोनशे कोटींच्या मदतीचा प्रस्ताव

## कृषिमंत्री पांडुरंग फुंडकर : दोन लाख हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान

**मुंबई (प्रतिनिधी) : चार दिवसांपासून विदर्भ, मराठवाड्यात झालेल्या गारपीटीनंतर आपतग्रस्तांच्या मदतीसाठी दोनशे कोटी रुपयांच्या मदत मागणीचा प्रस्ताव केंद्र सरकारला पाठविल्याची माहिती कृषिमंत्री पांडुरंग फुंडकर यांनी (ता. १४) दिली. ते मंत्रालयात पत्रकारांशी बोलत होते.**

कृषिमंत्री फुंडकर पुढे म्हणाले, की अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे शेतीपिकांच्या नुकसानीचा प्राथमिक अहवाल राज्य सरकारकडे आला आहे. या चारही दिवसांत मराठवाडा, विदर्भातील सुमारे दोन लाख हेक्टरवरील क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. सुमारे अठराशे गावे यात बाधित झाली आहेत. राज्य सरकारने तातडीने पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार महसूल, कृषी विभागाने बहुतांश पंचनामेही पूर्ण केले आहेत. येत्या दोन दिवसांत शिल्लक पिकांचे पंचनामेही पूर्ण होतील. त्यानुसार शेतीपिकांच्या नुकसानीपोटी केंद्र सरकारला सुमारे दोनशे कोटी रुपयांच्या मदत मागणीचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.



ज्या शेतकऱ्यांनी फळपीक विमा काढला असेल त्यांना विमा कंपनीकडून नुकसान भरपाई दिली जाईल.

पान ४ वर ▸

### जिल्हानिहाय नुकसान

बीड - १०,६३२ हेक्टर, जालना - ३२,०००, परभणी - ३,५९५, उस्मानाबाद - ५८३, हिंगोली - १४३, लातूर - २,६७९, जळगाव - २,४९५, बुलडाणा - ३२,७००, अमरावती - २६,५९८, अकोला - ४,३६०, वाशिम - ८,५०९, गोंदिया - ५४, वर्धा - ५६८, नागपूर - २१०, भंडारा - २०, गडचिरोली - १,२७,३२ हेक्टर.

# आळंदीत आजपासून ग्रामविकासावर मंथन

## सरपंच महापरिषदेचे मुख्यमंत्री, ग्रामविकासमंत्र्यांच्या उपस्थितीत आज उद्‌घाटन



**पुणे (प्रतिनिधी) :** सकाळ ॲग्रोवनच्या सातव्या सरपंच महापरिषदेला आळंदीत आजपासून (ता. १५) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ग्रामविकासमंत्री पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत प्रारंभ होत आहे. राज्यातील निवडक एक हजार सरपंचांचा सहभाग असलेल्या या महापरिषदेचे उद्‌घाटन सकाळी ११ वाजता होईल. दरम्यान, बुधवारी दुपारपासूनच महापरिषदेसाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातील सरपंच दाखल व्हायला सुरवात झाली असून ज्ञानोबारायांची आळंदी गजबजून गेली आहे.

महाराष्ट्राचा कृषिविकास आणि ग्रामसमृद्धीसाठी धोरणात्मक मंथन घडवून आणणारी एक ऐतिहासिक चळवळ म्हणून सरपंच महापरिषदेचा आवर्जून उल्लेख केला जातो. आजपासून सुरू होत असलेल्या सातव्या महापरिषदेत महिला सरपंचांसह एक हजारांहून अधिक सरपंच सहभागी होत आहेत. पान ४ वर ▸

### » ट्रॅक्टरसह अनेक बक्षिसे जिंकण्याची संधी

सरपंच महापरिषदेत सहभागी झालेल्या सरपंचांना मौलिक मार्गदर्शनाबरोबरच विविध बक्षिसांचे मानकरी होण्याची संधी मिळणार आहे. महापरिषदेचे मुख्य प्रायोजक 'फोर्स मोटर्स' यांच्याकडून भाग्यवान सरपंचाला ऑर्चर्ड ट्रॅक्टर मिळणार आहे. त्यासाठी ड्रॉ काढला जाणार आहे. याशिवाय महापरिषदेचे दुसरे प्रायोजक असलेल्या विक्रम चहा यांच्या वतीने राज्यातील दहा गावांमधील जिल्हा परिषदेच्या शाळांसाठी डिजिटल क्लासरूम दिले जाणार आहेत. प्रत्येक डिजिटल क्लासरूमसाठी ५५ हजार रुपयांचे साहित्य विक्रम चहाकडून दिले जाणार असून, या भाग्यवान गावांची नावेदेखील ड्रॉ पद्धतीने काढली जातील.

**उद्‌घाटन सत्राचे ॲग्रोवन आणि सकाळच्या फेसबुकवर थेट प्रक्षेपण, वेळ : सकाळी ११ वाजता**
www.facebook.com/AGROWON **आणि** www.facebook.com/SakalNews

# संत्रा पट्ट्यात थांबले सौदे

## फळगळीच्या फटक्यानंतर गारपिटीचा दणका

**नागपूर (प्रतिनिधी) :** वातावरणातील बदलामुळे गेल्या दोन वर्षांपासून फळगळीमुळे नुकसान सोसणाऱ्या संत्रा उत्पादकांना गेल्या दोन दिवसांत झालेल्या गारपिटीमुळे पुन्हा कोट्यवधी रुपयांचे नुकसान सोसावे लागले आहे. व्यपाऱ्यांनी केलेले मृग बहारातील संत्र्यांचे सौदेदेखील फिस्कटल्याने शेतकऱ्यांसमोर नवा पेच निर्माण झाला आहे.

विदर्भात सुमारे दीड लाख हेक्टरवर संत्रा लागवड आहे. यातील एक लाख दहा हजारांवर झाडे मोठी असून, त्यापासून फळे मिळतात. अमरावती, नागपूर जिल्ह्यांत सर्वाधिक तर बुलडाणा, वाशीम, वर्धा या जिल्ह्यांमध्येदेखील कमी अधिक प्रमाणात संत्रा लागवड आहे. एकूण लागवड तसेच फळधारणा होणाऱ्या एकूण क्षेत्रापैकी सुमारे ३२ हजार हेक्टरवरील क्षेत्राला गेल्या दोन दिवसांत झालेल्या गारपिटीचा फटका बसल्याचा अंदाज वर्तविला जात आहे.



काटोल, हेटीकुंडी (कारंजा, वर्धा), चांदूरबाजार, मोर्शी, वरुडचा काही भाग, अंजनगाव, अचलपूर तसेच बुलडाणा, वाशीम जिल्ह्यांतील संत्रा उत्पादकांचा बाधितांमध्ये समावेश आहे.

पान ४ वर ▸

# 'कृषी २०२२ - नवी सुरवात'वर होणार राष्ट्रीय चर्चा

## पंतप्रधान राहणार उपस्थित; देशभरातील २५० तज्ज्ञांसोबत मंथन



**सकाळ न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : देशातल्या शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे आश्वासन दिल्यानंतर केंद्रातील मोदी सरकारने याकरिताची दिशादर्शक चर्चा प्रक्रिया सुरू केली आहे. याच मुद्द्यावर १९ आणि २० फेब्रुवारीला पंतप्रधान नरेंद्र मोदी व कृषिमंत्री राधामोहनसिंह आदी उच्चपदस्थ देशभरातील २५० तज्ज्ञांसोबत येथे चर्चा करणार आहेत.

'कृषी २०२२-नवी सुरवात' या दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे येथे आयोजन करण्यात आले आहे. शेतकऱ्याचे उत्पन्न २०२२ पर्यंत दुप्पट करण्याबाबत राष्ट्रीय कृषी चर्चासत्रात ऊहापोह होणार आहे. सामान्य शेतकऱ्यांपासून 'नाफेड' व ग्रामीण बँकांपर्यंतचे प्रतिनिधी यात सहभागी होणार असल्याची माहिती राज्य कृषिमूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी दिली.

'पुसा' संस्थेत होणाऱ्या या चर्चा-संवाद कार्यक्रमासाठी एकूण सात गटांची रचना करण्यात आली आहे. असे सांगून ते म्हणाले, की उत्पादन ते विक्री या साखळीतल्या विविध विषयांबाबत हे गट तयार केले गेले आहेत. त्यातल्या एका गटाचे नेतृत्व मी करीत आहे. पिकांची काढणी झाल्यावर काय काय प्रक्रिया आवश्यक आहेत, याबाबत मी सादरीकरण करणार आहे. यावर कुणाच्या सूचना असल्यास pashapatelforfarmer@gmail.com या मेल आयडीवर पाठवाव्यात, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

२४ जानेवारीला याबाबतची प्राथमिक बैठक झाली होती. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याची घोषणा करून मोदी सरकारला दोन वर्षे पूर्ण झाली आहेत.

